3

**महाराष्ट्र शासन**

क्र.जमीन-२६१३/प्र.क्र.१७/ज-३.

महसूल व वन विभाग,
जागतिक व्यापार केंद्र, सेंटर-१ इमारत,
३२ वा मजला, कफ परेड,
मुंबई-४००००५.
दिनांक: १० सप्टेंबर, २०१३.

**विषय** फोर्स वन या कमांडो पथकाचे मुख्यालय व प्रशिक्षण केंद्रासाठी आरे वसाहतीमधील मौजे गोरेगांव येथील स.नं.१४ व १४ ब व १४ क न.भू.क्र.२५८ मधील फोर्स वनला मंजूर केलेल्या ९८.६ एकर जमिनीपैकी ८ x ५ = ४० चौ.मी. जमीन फोर्स वनकडून काढून घेऊन टाटा पॉवर कंपनीस भाडेपट्टयाने मंजूर करणेबाबत.

**ज्ञापन** :- जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना त्यांचे पत्र क्र. सी/ कार्या- अ/ एलएनडी/ ४०/ सीआर-२६/ २०१३, दि. ९.५.२०१३ ला अनुलक्षून असे कळविण्यात येते की, मौ. गोरेगाव येथील गृह विभागाला फोर्स वन कमांडो पथकाचे मुख्यालय व प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी मंजूर केलेल्या स.नं. १४ ब व १४ क, न.भू.क्र. २५८ मधील ३९९०४७.०० चौ.मी. (९८.६ एकर) जमिनीपैकी ८ X ५ चौ.मी. = ४० चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाची जमीन गृह विभागाकडून (फोर्स वन) काढून घेऊन सदर जमीन टाटा पॉवर कंपनीस विद्युत उपकेंद्र बांधण्यासाठी ३० वर्षांकरिता भाडेपट्टयाने व जमिनीच्या प्रचलित बाजारमूल्याच्या रकमेवर स्टेट बँकेच्या प्राईम लेंडीग दराप्रमाणे वार्षिक भुईभाडे वसूल करुन खालील अटी व शर्तींवर मंजूर करण्यास शासनाची याद्वारे मान्यता देण्यात येत आहे :-

१) जमिनीची मालकी शासनाचीच राहील. भाडेपट्टाधारकाचा त्यावर कोणत्याही प्रकारचा अधिकार राहणार नाही.

२) जमीन ज्या प्रयोजनाकरीता प्रदान केली आहे, त्याच प्रयोजनाकरीता जमिनीचा वापर करावा लागेल.

३) विद्युत सब स्टेशन बांधण्याकरिता सक्षम प्राधिकरणांची पूर्वमंजुरी घेण्याची जबाबदारी संबंधित विद्युत कंपनीची राहील. याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी खात्री करावी.

४) शासनाच्या मान्यतेशिवाय जमीनीचे हस्तांतर / विक्री करता येणार नाही. किंवा जमीन पोटभाडयाने देता येणार नाही किंवा तारण ठेवता येणार नाही.

५) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक १२.१२.२०१२ मधील तरतुदीनुसार भुईभाडयातील भाडेवाढ अनुज्ञेय राहील.

19 SEP 2013
19975



Scanned by CamScanner

६) भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीबाबत शासन वेळोवेळी जे धोरणात्मक निर्णय घेईल ते कंपनीवर बंधनकारक राहतील.

७) जमीन भाडेपट्टयाने देताना लागू होणा-या नेहमीच्या अटी व शर्ती लागू राहतील.

८) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना आवश्यक वाटतील अशा इतर अटी व शर्ती.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( माधव काळे )
शासनाचे उप सचिव

प्रति

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत, १० वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

प्रतिलिपी –

१) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, ३० वा मजला, सेंटर १ इमारत, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५.
२) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
३) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका. मुंबई-१.
४) विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन, म.रा. मुंबई.
५) जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा, प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
६) सहाय्यक संचालक, नगररचना व मुल्यांनिर्धारण, मुंबई उपनगर जिल्हा. ६)
७) प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर .
९) निवड नस्ती, ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, ३२ वा मजला, सेंटर १ इमारत, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-५.

-----

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

क्र. सी/कार्या-३डी/कावि-२२३/२०१३. ७०७
दिनांक :- 10 SEP 2013

**वाचले :** १) शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील ज्ञापन क्र. जमीन-२६१३/ प्र.क्र.९७/ज-३, दिनांक १०/०९/२०१३.

२) या कार्यालयाचा अहवाल क्र.सी/कार्या-७अ/एलएनडी/४०/सीआर-२६/२०१३, दिनांक ९/५/२०१३.

३) विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स-१, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील पत्र क्र.फोर्स-१/ कॉपोमनो/विद्युत जोडणी/२०१२/५३४७, दिनांक २८/१२/२०१२. तसेच पत्र क्र .फोर्स-१/ कॉपोमनो/विद्युत जोडणी/२०१३/८८४, दिनांक १६/०३/२०१३.

**आदेश :**

मौजे-गोरेगांव, ता.बोरीवली येथील गृह विभागाला फोर्स वन कमांडो पथकाचे मुख्यालय व प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी मंजूर केलेल्या स.नं.१४ब व १४ क, न.भू.क्र.२५८ मधील ३९९०४७.०० चौ.मी. (९८.६ एकर) जमिनीपैकी ८ मी. x ५ मी. = ४० चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाची जमीन मे. टाटा पॉवर कंपनीस लि. यांना विद्युत उपकेंद्रासाठी भाडेपट्ट्याने / कब्जेहक्काने देण्याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन यांनी उपोद्घोतात नमूद संदर्भ क्रमांक ३ अन्वये विनंती केली होती. त्याअनुषंगाने मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेमार्फत शासनास या कार्यालयाचे पत्र दिनांक ०९/०५/२०१३ अन्वये अहवाल सादर करण्यात आला होता.

सदर बाबत उपोद्घोतात अ.क्र. १ वर नमूद शासन ज्ञापन दिनांक १०/०९/२०१३ अन्वये विषयांकीत जमीन गृह विभागाकडून (फोर्स वन) काढून घेऊन मे. टाटा पॉवर कंपनीस विद्युत उपकेंद्र बांधण्यासाठी त्या जमीनीच्या प्रचलित बाजारमूल्याच्या रक्कमेवर स्टेट बँकेच्या प्राईम लेंडीग दराप्रमाणे वार्षिक भुईभाडे वसूल करुन ३० वर्षांकरीता शासन अटी व शर्तीवर भाडेपट्ट्याने मंजूर करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

ज्या अर्थी शासन महसूल व वन विभाग यांनी मौजे-गोरेगांव, ता.बोरीवली येथील गृह विभागाला फोर्स वन कमांडो पथकाचे मुख्यालय व प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी मंजूर केलेल्या स.नं.१४ब व १४ क, न.भू.क्र.२५८ मधील ३९९०४७.०० चौ.मी. (९८.६ एकर) जमिनीपैकी ८ x ५ चौ.मी. = ४० चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाची जमीन गृह विभागाकडून (फोर्स वन) काढून घेऊन, सदर जमीन मे. टाटा पॉवर कंपनीस विद्युत उपकेंद्र बांधण्यासाठी ३० वर्षांकरिता भाडेपट्ट्याने देण्यास मंजूरी दिलेली आहे. प्रचलित कार्यपध्दतीप्रमाणे हस्तांतरीत होणारे क्षेत्र गृह विभागाकडून (फोर्स वन) यांचेकडून महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित होणे व त्यानंतर महसूल व वन विभागा मार्फत विहित अटी व शर्तीवर मे. टाटा पॉवर कंपनीस भाड्याने देण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्या



Scanned by CamScanner

नुसार शासन महसूल व वन विभाग यांचेकडे प्रत्यार्पित होणा-या भूखंडाचे क्षेत्रास अभिलेख सदरी शासन महसूल व वन विभाग यांचे नांव दाखल करण्याची कारवाई करण्यात येत आहे. प्रस्तुत जमिनीचे प्रचलीत बाजारमुल्य रु२६,५००/- प्रति चौ.मी. आहे. त्यानुसार संपूर्ण बाजार मुल्याची रक्कम रु १०,६२,२७२/- इतकी येते. सदर रक्कमेवर सन २०१२ चे स्टेट बँकेच्या प्राईम लँडींग दराप्रमाणे (१४.७५%) वार्षिक भुईभाडयाची रक्कम रु.१,५६,६८५/- वसूल करुन मे. टाटा पॉवर कंपनी लि. यांना वर नमुद केलेले ८ x ५ = ४० चौ.मी. क्षेत्र विद्युत सब-स्टेशन करीता ३० वर्षाचे भाडेत्त्वावर देणेबाबत, मी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर शासन ज्ञापनातील अटी/शर्तीस अधिन राहून तसेच खालील अटी व शर्तीवर मान्यता देत आहे.

**अ) शासन ज्ञापन दिनांक १०/०९/२०१३ मधील अटी व शर्ती :**

१) जमिनीची मालकी शासनाचीच राहील. भाडेपट्टाधारकाचा त्यावर कोणत्याही प्रकारचा अधिकार राहणार नाही.

२) जमीन ज्या प्रयोजनाकरीता प्रदान केली आहे, त्याच प्रयोजनाकरीता जमिनीचा वापर करावा लागेल.

३) विद्युत सब स्टेशन बांधण्याकरीता सक्षम प्राधिकरणांची पूर्वमंजूरी घेण्याची जबाबदारी संबंधित विद्युत कंपनीची राहील.

४) शासनाच्या मान्यतेशिवाय जमीनीचे हस्तांतर / विक्री करता येणार नाही किंवा जमीन पोटभाडयाने देता येणार नाही किंवा तारण ठेवता येणार नाही.

५) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक १२.१२.२०१२ मधील तरतुदीनुसार भुईभाडयातील वाढ अनुज्ञेय राहील.

६) भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीबाबत शासन वेळोवेळी जे धोरणात्मक निर्णय घेईल ते कंपनीवर बंधनकारक राहतील.

**ब) इतर अटी व शर्ती :**

१) मे.टाटा पॉवर कंपनी लि. यांनी वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम **रु.१,५६,६८५/-** पे ऑर्डर व्दारे **Collector, Mumbai Suburban District** यांचे नांवे काढून १५ दिवसात या कार्यालयात जमा करावी. सदर रक्कम शासन जमा केल्यानंतर जागेचा ताबा देण्यात येईल.

२) विद्युत सबस्टेशन बांधण्याकरीता सक्षम प्राधिकरणांची पूर्व मंजूरी घेण्याची जबाबदारी संबंधित विद्युत कंपनीची राहील. याबाबत तहसिलदार बोरीवली, नगर भूमापन अधिकारी, गोरेगांव व पोलीस विभाग (फोर्स वन) यांनी खात्री करावी.

३) विषयांकीत जमीन गृह विभागाकडून (फोर्स वन) काढून घेऊन सदर जमीन टाटा पॉवर कंपनीस भाडेपट्टयाने देण्याबाबत नगर भूमापन अधिकारी, गोरेगांव व तहसिलदार बोरीवली यांनी संयुक्त कार्यवाही करावी.

४) मंजूर जागेचा वापर विद्युत पुरवठा करण्यासाठी फक्त सब स्टेशन करता करावा.



Scanned by CamScanner

५) सब स्टेशनउभारण्याबाबत शासन भविष्यात ठरविल त्या अटी व शर्ती मे. रिलायन्स एनर्जी यांना मान्य राहतील.

६) कंपनीस किंवा तीचे व्यवस्थापक व अभिहस्तांकी त यांना मंजूर भाडेपट्टयाची जमीन किंवा तिच्यावरील कोणताही भाग किंवा हितसंबंध हस्तांतरीत विनापरवाना करता येणार नाही.

७) कंपनीस मंजूर जमीन विक्रि, हस्तांतरण, पोट भाडेपट्टयाने, गहाण/तारण ठेवता येणार नाही.

८) सदर जागेची आवश्यकता शासनांस भासल्यास, ती मुदतपूर्व काढून घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी/ शासन यांना राहील.

९) भाडेपट्टेदार जिल्हाधिकारी यांचे कडून प्राधिकृत करण्यांत येईल अशा सरकारी अधिका-यांना सर्व वाजवी वेळांत सदर जमिनीच्या कोणत्याही भागात प्रवेश करुन त्यांचे निरिक्षण करण्यांस परवानगी देईल.

१०) सर्व खाणी व खनिज द्रव्य यावर शासनाचे अधिकार असेल आणि खाण काम करण्याच्या अथवा खनिज द्रव्ये शोधण्याच्या प्रयोजनार्थ सदर जमिनीवर प्रवेश करण्याचे स्वातंत्र्य शासनास राहील.

११) भाडेपट्टेदार यांना शासना समवेत भाडेपट्टा करारनामा करावा लागेल.

१२) वरील कोणत्याही अटी / शर्तीचा भंग झाल्यास नूकसान भरपाई न देता जमीन शासनजमा करणेत येईल.

१३) वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र कंपनीने रु.२२०/- चे मुद्रांकीत पेपरवर १५ दिवसात सादर करावे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी
यांची सही आहे.

प्रति,
व्यवस्थापक,
मे.टाटा पॉवर कंपनी लि.
इस्टेट डिपार्टमेंट, धारावी रिसिव्हिंग स्टेशन,
माटुंगा, मुंबई - ४००० १९.

प्रत :- १) मा.प्रधान सचिव ( महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांचेकडे माहितीकरीता सविनय सादर.

२) मा.विभागीय आयुक्त कोंकण विभाग, कोंकण भवन यांना माहितीकरीता सविनय सादर.

३) विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स-१ महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कडे सविनय सादर.

२/- मौजे गोरेगावं स.नं.१४ व १४ब, १४क, न.भू.क्र.२५८ मधील ४० चौ.मी. जमीनीचा ताबा मे.टाटा पॉवर कंपनी लि. यांना देण्याबाबत तसेच प्रस्तावित भूखंड महसूल व वन विभागाकडे हस्तांतरीत करण्यास तहसिलदार बोरीवली व नगर भूमापन अधिकारी ~~[illegible]~~ मालाड यांना आवश्यक ते सहकार्य करावे.

४) तहसिलदार बोरीवली यांचेकडे रवाना.

२/- विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स-१ यांचेशी संपर्क साधून शासन महसूल व वन विभाग यांचेकडे प्रत्यार्पित होणा-या भूखंडाचे क्षेत्राची खात्री करून संबंधीत गांवचे अभिलेखात महसूल व वन विभाग यांचे नांवाची नोंद घेवून अद्यावत अभिलेखाची प्रत या कार्यालयात सादर करावी.



Scanned by CamScanner

३/- नगर भूमापन अधिकारी, मालाड यांचे समवेत मे.टाटा पॉवर कंपनी यांचेशी संपर्क साधून जमीनीचा ताबा देण्याची कार्यवाही करावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल आवश्यक त्या कागदपत्रासह विनाविलंब सादर करावा.

५) नगर भूमापन अधिकारी, मालाड यांचेकडे रवाना.

२/- विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स-१ यांचेशी संपर्क साधून शासन महसूल व वन विभाग यांचेकडे प्रत्यार्पित होणा-या भूखंडाचे क्षेत्राची खात्री करून संबंधीत गांवचे अभिलेखात महसूल व वन विभाग यांचे नांवावी नोंद घेवून अद्यावत अभिलेखाची प्रत व नकाशा या कार्यालयात सादर करावी.

३/- तहसिलदार बोरीवली यांचे समवेत मे.टाटा पॉवर कंपनी यांचेशी संपर्क साधून जमीनीचा ताबा देण्याची कार्यवाही करावी. केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल आवश्यक त्या कागदपत्रासह विनाविलंब सादर करावा.

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही असे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

COLLECTOR OF
MUMBAI SUBURBAN DISTRICT
मुंबई उपनगर जिल्हा

10/09/13
Issued

Scanned by CamScanner